

**श्री. रमेश मगनलाल तन्ना**
कॅम्प ऑर्गनायजर
रा. श्रीवर्धन, जिल्हा रायगड,
पिन नं. : ४०२११.
मो. नं. : ९८५०१४२०४३

**डॉ. हळदिपुरकर साहेब** यांचे **लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल** यांचे श्रीवर्धन येथे सुमारे ५ वर्षापासुन मोफत नेत्र बिंदू तपासणी व शस्त्रक्रिया करीता शिबीरे सुरु आहेत. आतापर्यंत श्रीवर्धन व आसपासच्या गावांमधून सुमारे ३००० गरजुंनी याचा लाभ घेतला.

आंधांना आधार, मानवतेचे तेजस्वी व ज्वलंत असे साक्षात रुप गरिबांचे कैवारी व आस्था स्थान असलेल्या या ट्रस्ट विषयी लिहायला शब्द कमी पडत आहेत.

पेशंटसना शिबीर स्थळापासुन मोफत पनवेल येथे नेणे, तपासणी, शस्त्रक्रिया, औषधोपचार, काळाचष्मा, औषध, चहा, नाश्ता, जेवण, वास्तव्य शिवाय पुन्हा शिबीराचे ठिकाणी मोफत आणून सोडणे हे अत्यंत प्रशंसनीय आहे.

डॉ. हळदीपुरकर साहेब यांचे स्वतःचे बारकाईने लक्ष असते. शिबीरासाठी येणारे तज्ञ डॉक्टर व सहकारी. शिबीर प्रमुख श्री. पाटील साहेब तसेच चालक श्री. विलासराव या सर्वांची हसतमुख विनम्र सेवा याला तोड नाही. कधी कोणाकडे अपेक्षा नाही केवळ सेवा हाच जणु या ट्रस्टचा धर्म आहे.

मी परम पवित्र श्रीकृष्ण कनैयाच्या चरणाजवळ नतमस्तक होऊन प्रार्थना करतो की, या डॉ. हळदीपुरकर साहेबांच्या ट्रस्ट रुपी मानवतेचा धर्मरथ अविरत धावत राहो व गरजुंना लाभ लाभत राहो. डॉ. हळदीपुरकर साहेब व त्यांच्या तमाम सहकाऱ्यांना उदंड आयुष्य लाभो. धन्यवाद, नमस्कार, जयश्रीकृष्ण

**श्री. रमेश मगनलाल तन्ना**
कॅम्प ऑर्गनायजर, श्रीवर्धन